MHLA050001562022

विशेष दिवाणी दावा क्र.४५/२०२२
माधवराव वि. साहेबबी.

## नि.क्र. ४५ खालील आदेश

**०१.** सदरचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६ नियम ७ अन्वये दाखल केला असून दावा दाखल करताना नजरचुकीने व घाईने वादीला स्पष्टीकरण करायचे राहून गेले, त्यामुळे त्या स्पष्टीकरणाचे एक वाक्य दाव्यात नमूद करण्यासाठी प्रस्तुत अर्ज देण्यात आला आहे.

**०२.** प्रतिवादींनी दिलेल्या म्हणण्यानूसार दावा दाखल करताना सदर बाब वादींच्या आकलनार्थ होती तरीही ती नमूद न केल्याने अर्ज रद्द करावा अशी विनंती केली.

**०३.** उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला. वादपत्र वाचले.

**०४.** वादपत्र परिच्छेद क्र.६ मध्ये ओळ क्र.५ मध्ये वादीने, 'वादीचा दावा प्लॉट हडप करण्याचा वाईट उद्देश ठेवूनच वादीस प्रतिवादींनी त्याचे दावा प्लॉटवरुन बेकायदेशीररीत्या व बळजबरीने व जबरदस्तीने दि.१७/१२/२०२१ व १८/१२/२०२१ रोजी बेदखल करून पत्रयाचा शेड मारला आहे' असा उल्लेख आहे. हाच उल्लेख वादीला दावा परिच्छेद क्र.२ व ३ मध्ये उल्लेखीत करायचा आहे. याबद्दल प्रतिवादींची कैफीयत दाखल आहे. या उल्लेखाने दाव्याच्या स्वरुपात बदल होत नसल्याने प्रतिवादींना रुपये १,०००/- इतकी कॉस्ट देवून अर्ज मंजूर करण्यात येतो. आवश्यक दुरुस्ती नियमानूसार वादींनी विहीत मुदतीत करुन घ्यावी व दुरुस्ती दावा प्रत सादर करावी.

स्वाक्षरीत/-

**दिनांक २९/०९/२०२५.**

**[एस.एन.सरडे]**
**दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहदमपूर.**